IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाभारतातील व्यक्तिरेखांची इरावती कर्वे यांनी केलेल्या मांडणीची चिकित्सा

**डॉ. निकम मनोहर सुभाष**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा घटक महाविद्यालय कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*इरावती कर्वे*
*महाभारत*

**ABSTRACT**

महाभारतातील सर्व स्त्री पात्रांना समोर आणले तरी एका विशिष्ट चाकोरीतून पलीकडे बघण्याची मानसिकता समाजाची कधीही येणार नाही आणि तशी हिम्मतही होणार नाही. फार तर काय इरावती कर्वे यांनी मांडलेल्या युगांत मध्ये एक एक स्त्री पात्रांची व्यथा त्यांच्या साम्यानुभावातून समजून घेता येईल.

इरावती कर्वे या देखील जी.ए.कुलकर्णी यांनी उभ्या केलेल्या नियतीवादाचा बळी कसा एक एक मनुष्य ठरतो हे आपल्या कथेतून दाखवतात त्याप्रमाणे महाभारताची कथा ही देखील अशाप्रकारची बाब ठसविण्याचे तर काम करत नाही नाही अशी शंका घेतात त्यांच्याच शब्दात (कर्वे इरावती, २००६, पृ. १,२) “मानवी प्रयत्न निष्फळ असतात, मानवी जीवन हे विफलच असायचे, हा धडा मनावर बिंबवण्यासाठी तर महाभारत रचलेले नाही ना, असे सारा वेळ वाटते”. कर्वे यांना वाटते तरीही त्या त्या व्यक्तीचा संघर्ष व्यथा ही आपली व्यथा होऊन जाते. इरावती कर्वे या समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पण मानसशास्त्रीय विश्लेषण पद्धती वापरून एक एक पात्रांच्या व्यथा आणि मर्यादा आपल्या समोर उघड करतात. त्यांची मांडणी ही पूर्णपणे नवीन असली तरी मार्क्सवादी आणि अन्य प्रवाह यांच्याकडून नंतरच्या काळात वेगळ्या पद्धतीने महाभारताकडे बघण्यात आले आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Nikam, M. S. (2025). *महाभारतातील व्यक्तिरेखांची इरावती कर्वे यांनी केलेल्या मांडणीची चिकित्सा.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **802–806.**

**प्रस्तावना :**

महाभारतातील सर्व स्त्री पात्रांना समोर आणले तरी एका विशिष्ट चाकोरीतून पलीकडे बघण्याची मानसिकता समाजाची कधीही येणार नाही आणि तशी हिम्मतही होणार नाही. फार तर काय इरावती कर्वे यांनी मांडलेल्या युगांत मध्ये एक एक स्त्री पात्रांची व्यथा त्यांच्या साम्यानुभावातून समजून घेता येईल.

इरावती कर्वे या देखील जी.ए.कुलकर्णी यांनी उभ्या केलेल्या नियतीवादाचा बळी कसा एक एक मनुष्य ठरतो हे आपल्या कथेतून दाखवतात त्याप्रमाणे महाभारताची कथा ही देखील अशाप्रकारची बाब ठसविण्याचे तर काम करत नाही नाही अशी शंका घेतात त्यांच्याच शब्दात (कर्वे इरावती, २००६, पृ. १,२) "मानवी प्रयत्न निष्फळ असतात, मानवी जीवन हे विफलच असायचे, हा धडा मनावर बिंबवण्यासाठी तर महाभारत रचलेले नाही ना, असे सारा वेळ वाटते". कर्वे यांना वाटते तरीही त्या त्या व्यक्तीचा संघर्ष व्यथा ही आपली व्यथा होऊन जाते. इरावती कर्वे या समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पण मानसशास्त्रीय विश्लेषण पद्धती वापरून एक एक पात्रांच्या व्यथा आणि मर्यादा आपल्या समोर उघड करतात. त्यांची मांडणी ही पूर्णपणे नवीन असली तरी मार्क्सवादी आणि अन्य प्रवाह यांच्याकडून नंतरच्या काळात वेगळ्या पद्धतीने महाभारताकडे बघण्यात आले आहे.

**उद्देश :**

महाभारतातील व्यक्तिरेखांची इरावती कर्वे यांनी केलेल्या मांडणीची चिकित्सा आजचा काळाचा संदर्भ डोळ्यासमोर ठेऊन करणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**विषयविवेचन :**

भीष्मावर जी कठोर टीका शिशुपाल यांच्या तोंडी आली आहे ती इरावती कर्वे यांना मान्य आहे. अंबा, अंबिका, अंबालिका, कुंती आणि माद्री ह्या पाच बायकांची भीष्मामुळे विटंबना झाली हे त्या स्वीकारतात. ज्या राज्यसभेत तो वडील म्हणून बसे, तेथे झालेली एका स्त्रीची विटंबना थांबवण्याचा त्याने प्रयत्न केला नाही. त्याऐवजी तो धर्म, अधर्माची व्यर्थ चर्चा करीत बसला म्हणून त्या भीष्माला दोष देतात. इरावती कर्वे यांच्या मते, भीष्मामुळे पहिले दहा दिवस महाभारतीय युद्ध हे झालेच नाही. त्याकाळात केवळ लुटीपुटीची लढाई झाली. त्यांचा प्रयत्न हा हे युद्ध टाळण्याचा आणि दोन्ही गटात समेट घडवून आणण्याचा होता. इरावती कर्वे या सर्व दृष्टींनी भीष्म याला दुर्दैवी ठरवितात. त्या तार्किक विश्लेषण घटनांचे करतात जे वेगळेपण दर्शविते पण शेवटी त्याही अनाकलनीय घटना हे पूर्वनियोजित मानून पुढे सरकतात. भीष्माचे इच्छामरण देखील फार आनंदी नाहीतर दु:खीच मानतात. (कर्वे इरावती, २००६, पृ. ८-२३)

गांधारीबद्दल कर्वे लिहितात की, सासरच्या संपत्तीच्या स्वप्नात रंगलेल्या गांधारीला तिची दासी ही बातमी देते की घात झाला तुझे ज्याच्याशी लग्न व्हावयाचे, ते राजकुमार जन्मांध आहेत. ही बातमी ऐकून गांधारी बेशुद्धच पडते. गांधारीला प्रारंभीच मिळालेली वेदना काय तर ही होती. धृतराष्ट्र यांच्या तोंडी संवाद येतात की "आम्ही कुरुकुलातील पुरुषांनी बायकांच्यावर फार अन्याय केले. त्याचे प्रायश्चितदेखील आम्हाला पुरेपूर मिळाले". अर्थात त्याच्या म्हणण्याचा या पुस्तकात अर्थ काय तर पुरुषांत व्यंग असूनही स्त्रियांना त्यांच्याशी विवाहित व्हावे लागले. याबरोबर शेवटी धृतराष्ट्र, गांधारी, कुंती आणि विदुर हे वणव्यापासून लांब पळून न जाता त्याच्याकडेच जाऊन स्वा होतात हे दाखवले आहे. (कर्वे इरावती, २००६, पृ. २७-३६)

कुंतीबद्दल एक वेगळाच हळवेपणा कर्वे या दाखवतात ती जरी शेवटी वणव्यात जळून खाक होते. पण कर्वे यांच्या मांडणीप्रमाणे ती आयुष्यभर एकप्रकारे वणव्यातच जळत होती. तिने घेतलेल्या प्रत्येक जबाबदाऱ्या हे एकप्रकारे ओढवून घेतलेल्या आगीच्या ज्वालाच होत्या. विदुराचे व्यक्तिमत्व कॉ. शरद पाटील उभे करतात त्यापेक्षा एकदमच वेगळे पण परंपरेला धरूनच कर्वे या उभे करतात. एखाद्या जबाबदार बापाप्रमाणे तो पांडवांशी वागला असे मत कर्व विदुरबद्दल व्यक्त करतात. त्याने वेळोवेळी पांडवांना मदतच केली. पण स्वत:ला काही फार मोठे मिळाल्याचे दु:ख त्याला कधीही झाले नाही. (कर्वे इरावती, २००६, पृ. ३७-५७)

कर्वे यांना सीतेसारखी द्रोपदी ही देखील भूमिकन्या असल्याचे मान्य आहे. सीतेला चौदा वर्ष वनवास तर द्रोपदी हिला तेरा वर्ष वनवास आला दोघांचे आयुष्यही विफल ठरले असे त्यांना वाटते. पण त्यांना महाभारत आणि रामायण यात एक मुख्य भेद वाटतो तो म्हणजे रामायण हे आदर्श पुरुषाचे चरित्रगायन आहे तर सीता ही स्त्रियांचा आदर्श ठरते पण इतर पात्रे राम आणि सीता या दोघांच्यादेखील काहीही कामाची नसल्याचे कर्वे यांना वाटते. पण अनेक गुंतागुंतीच्या संबंधांमुळे द्रोपदीचे चित्र अधिक भरीव आणि एकांगी असल्याचे दिसते. त्याकाळची सर्व राजकीय गुंतागुंत यात मांडलेली आहे. त्यांच्या मते द्रोपदीशी लग्न झाल्यामुळे पांडवांना नुसती सुंदर बायकोच मिळाली नाहीतर प्रतिष्ठा आणि राज्य देखील मिळाले. द्रोपदीमुळेच पुढे कौरवांच्या दरबारात वा समाजात पांडवांना मान, सन्मान मिळाला असे दिसते. (कर्वे इरावती, २००६, पृ. ७३-७७)

इरावती कर्वे या द्रोपदी चरित्र मांडताना रामायण आणि महाभारत येथील प्रसंग याबरोबर तिची सीतेसोबत तुलना करीत राहतात. द्रोपदी आणि सीता या दोघींच्याकडून ज्या ज्या चुका घडल्या त्याचे त्यांना भरपूर प्रायश्चितदेखील मिळाल्याचे कर्वे सांगतात. सीतेने शूर्पणखा हिला हसून चेष्टा केली तशी द्रोपदी देखील चारचौघांत दुर्योधन यास हसली होती. पुढे पुढे द्रोपदीने काय

काय चुका केल्या याची सविस्तर कथा कर्वे या सांगतात. इरावती कर्वे ह्या द्रोपदीच्या मनाची व्यथा, तिचे अर्जुनावर भाळणे या गोष्टी उलगडून दाखवितात. वास्तव घटनांशी संबंध जोडून मनाच्या बोध-अबोध अवस्था त्या एखाद्या मानसोपचार तज्ञाप्रमाणे खुल्या करतात. वास्तव घटनांशी, मनाच्या भावना व तर्क जोडल्याने त्या पात्रांना विद्वत्तापूर्णरित्या जिवंत करू पाहतात. पण याने ऐतिहासिकता जाऊन मनोकाल्पनिकता मात्र दाट होत जाते आणि वाचणाऱ्याच्या हाती उरते ती निराशा आणि नकारत्मकता. (कर्वे इरावती, २००६, पृ. ७८-९६)

कर्वे यांच्या मते, महाभारत दाखवते की महाभारतातील प्रत्येक व्यक्ती पराजित व निराश आहे. कर्ण, द्रोण, अश्वत्थामा या पात्रांची व्यथा व कथा त्या सविस्तरपणे चर्चा करतात. कर्ण हा अनेकवेळा पराभूत झालेला असला तरी अनेक नवीन कथांनी त्याच्या कमजोरीवर पांघरून झाकण्याचा प्रयत्न केला आहे. द्रोण व्यवहारी असूनही पुत्रप्रेमाने युद्धावेळी चुकून गांगरलेला दाखवला आहे तर स्वत:वर व कुटुंबावर मित्रांवर अन्याय झाला म्हणून ब्राह्मणांची नीती, कर्तव्य धुळीला मिळविण्यास अश्वत्थामा हा तयार होतो. एक मोठे प्रकरण कर्वे यांनी कृष्ण वासुदेव म्हणून लिहिले आहे. त्यांना महाभारतातला कृष्ण हा जरा वेगळा वाटतो. ज्याचा प्रवेश हा पांडवांच्या आयुष्यात आणि महाभारतातसुद्धा द्रोपदीच्या स्वयंवरापासून होतो. इतर पात्रांपेक्षाही जास्त बारकाईने कृष्णाच्या बारीक सारीक स्वभावविशेष त्या उलगडतात. त्यांना खऱ्या अर्थाने कृष्णाने नुसती गीताच सांगितली नाही तर तो गीता जगला असे वाटते. (कर्वे इरावती, २००६, पृ. १११-१९८)

महाभारतीय युद्धाचा काळ कर्वे या इ.स.पूर्व १२०० ते पूर्व १००० असा मानतात. त्या दोन मुलांची भांडणाची कथा यास मानतात. यात क्षत्रिय आणि ब्राम्हण हे स्पष्टपणे दोन वर्ण होते. एकमेकांचे प्रतिस्पर्धी, एकमेकांचे पूरक आणि आधारस्तंभ म्हणून ते राहत होते. त्यांच्या मते विष वर्गातील व्यक्तींचे चित्रण यात नाही तसेच शुद्ध वर्गाबद्दल देखील त्यांना वाटते. कर्वे सर्वसाधारण प्रजेत विश आणि दास यांना मोडतात. ह्या काळानंतर वणीज हे धनवान व बलशाली झाले आणि त्यांनीच वैश्य वर्ग हा व्यापला असे वाटते. शेतकरी व गोपाल हे चौथ्या वर्णात गेले असावेत. वैश्य वर्गात असलेल्या धनवान लोकांच्या मालकीची जी जमीन होती ती स्वत: न करता गरीब शेतकऱ्यांना किंवा भूमिहीन मजुरांना कसायला देत ते स्थानिक नसून ते ह्या गावाकडून त्या गावाकडे जाणारे असे अस्थिर होते. (कर्वे इरावती, २००६, पृ. २०१-२०३)

महाभारतीय युद्धात भाग घेणारा समाज हा त्रैवर्णीक असावा असे कर्वे यांना वाटते. कृषी व गोरक्षण वैश्यांकडेच असल्याने शुद्रांची संख्या ही पुढील काळापेक्षा कमी असल्याचे त्यांना वाटते. वैश्यांची आर्थिक मजबुती व शुद्र वर्गाची मजबूत चौकट त्यांना महाभारताच्या युद्धाच्यानंतरची वाटते. नंतरच्या काळातील धर्माचे व्यापक स्वरूप नसल्याचे त्या नोंदवितात. (कर्वे इरावती, २००६, पृ. २०३-२०५)

कर्वे यांना कर्ण धडपड वैयाक्तिक वाटते तो सर्व सूतांना क्षत्रियत्वाचे दार मोकळे करू इच्छित नव्हता. जन्माने क्षत्रिय आहोत, हे सिद्ध करण्याची त्याची धडपड होती. कर्ण मेल्यावर क्षत्रियांच्या वतीने अग्निसंस्कार झाल्याने क्षत्रियत्व त्याला एकट्याला मिळाले त्याच्या मुलाला नाही कारण तो सूत स्त्रीपासून जन्माला आला होता. जाती आणि त्यांच्या विवाहाची बंधने आपल्याला येथे विविध उदाहरणातून मिळतात. खालच्या जाती ह्या वरच्या वर्णात जाऊ इच्छित होत्या. फक्त एका जातीतून दुसरीत जाण्याचा प्रयत्न नव्हता. कर्वे यांना सर्व जाती वा वंश यांचे स्थान हे निश्चित झालेले दिसत नाही. राजा असूनही क्षत्रिय नाही किंवा होता येत नव्हते असे उदाहरण कर्णाचे आणि पुढील काळात पसेनदी याचे वाटते. तरी कर्वे यांना वर्ण आणि जाती असलेल्या समाजाचे महाभारतातील चित्र फार उठावदार नाही वाटत. वर्ण हे दृढ होते, तर जाती ह्या अस्तित्वात होत्या. (कर्वे इरावती, २००६, पृ. २०५-२०७)

समाजातील पितृप्रधानतेवर देखील त्या चर्चा करतात. याबरोबर स्त्रियांच्या चोकोरीबद्द जीवनाच्या नियमांना देखील त्या हात घालतात. याकाळाची राज्ये ही लहान लहान होती. वंशपरंपरेने बसलेला पुरुष हा राजा होता. अनेक राज्ये जिंकून साम्राज्य निर्माण करण्याची प्रथा नव्हती. याकाळातील दैवतकल्पना ह्या वेद-ब्राह्मणकालीन होत्या. (कर्वे इरावती, २००६, पृ. २१०-२१६)

मानवी जीवनाच्या मर्यादा ह्या महाभारतात स्वच्छ, स्पष्ट आल्या असे कर्वे यांना वाटते. ह्या ओलांडण्याची कोणतीही स्वप्नसृष्टी यात नाही. नंतरच्या काळात मात्र मोठी मोठी स्वप्ने दाखवली गेली. अनेक नैतिकतेच्या कल्पना रंगवल्या गेल्या ज्या वास्तवाला धरून नव्हत्या म्हणून महाभारत हे कर्वे यांना जास्त वास्तववादी आणि व्यावहारिक वाटते. कर्वे यांना यांना महाभारतीय समाज अनेक अर्थानी संकुचित वाटतो. भौतिक दृष्टीने तो त्यांना कृषी-गोरक्षकांचा वाटतो. ते स्थानिक लोकांत मिसळत होते पण त्यांचे सांस्कृतिक जीवन हे गोरक्षक आर्यांच्या मर्यादेतच राहिले. घोडा जरी त्यांचा आवडता जनावर असला तरी कोणाला घोड्यावर बसता येत नव्हते. तर जुंपला जात होता रथाला. (कर्वे इरावती, २००६, पृ. २२६-२३१)

इरावती कर्वे यांच्या युगांतमध्ये आलेल्या मांडणीपेक्षा वेगळी मांडणी आणि दृष्टीकोन आपल्याला महाभारताच्या बाबतीत गणेश देवी, डॉ. आ.ह. साळुंखे, उपिंदर सिंह यांचा आपल्याला बघण्यास मिळतो. कोट्यवधी लोकांवर महाभारताने आपला मोठा ठसा उमठविला हे गणेश देवी यांना मान्य आहे. याचे कथानक हे मिथक, कल्पितकथा, इतिहास व काही प्रमाणात केवळ

कल्पनाविलास ह्यांची मोट बांधणारे सरळ, साधे असे कथानक आहे. त्यांना प्रत्येक पिढीत स्त्री पात्रांचे महत्व मान्य आहे. गणेश देवी यांना हे महाकाव्य संपूर्ण भारतीय समाजाला रिजवते याची खात्री आहे पण त्यांना याची चिंता जास्त आहे की ते राष्ट्रीय महाकाव्य म्हणून योगदान देते का? याचा शोध ते आपल्या पुस्तकातून घेतात. त्यांना महाभारत हे रामायणापूर्वीचे असल्याची खात्री आहे. द्रोपदी वस्त्रहरणाचा भाग हा ज्या पुस्तकातून वगळलेला आहे, सर्पाचा राजा वासुकी याला पांडव यांच्यापेक्षा जास्त महत्त्व दिलेल्या अशा भिल्ल रामायणाचा ते उल्लेख करतात. जे भिल्लांच्या पवित्र्याच्या कल्पनाविश्वाशी जोडलेले आहे. त्यांना भिल्ली महाभारत हे व्यासाच्याही आधीचे वाटते जे पूर्णपणे शृंगारमुक्त आहे. (देवी गणेश, २०२२, पृ. २१-४७)

गणेश देवी हे कर्वे यांच्या युगांतमधील मांडणीची देखील दखल घेतात ज्यात पशुपालन राज्यपद्धतीचे कृषीप्रधान आद्य सामंतसहीच्या राज्ययंत्रणेत झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केले आहे. एकूण तीस दशकांहून अधिक काळ हा महाभारताने वठवलेली सांस्कृतिक भूमिका देवी यांना महत्त्वपूर्ण वाटते. ऋग्वेदकाळातील एकमेव महत्त्वाची स्त्रीदेवता उषा वाटते. महाभारत कथेत स्पष्ट वैदिक देवतांचे उल्लेख येतात. याबरोबरच यज्ञांचा, राजांचा उल्लेख येतो. यावरून त्यांना एक समग्र गतकाळ शब्दबद्ध करीत असण्याची शक्यता वाटते. पण यात मूळ भारतीय मातृसत्ताक पद्धतीच्या खाणा-खुणांचा उल्लेख असावा अशी त्यांना शास्वती वाटत नाही . (देवी गणेश, २०२२, पृ. ५५-१०७)

अनेक अमानवी घटना व चमत्कार हे महाभारतीय पात्रांशी जुळलेले असल्याने गणेश देवी यांना याबाबी मिथकांशीच घडू शकतात असे वाटते. ते पूर्ण कल्पनाविलास या ग्रंथास मानीत नाहीत. त्यांना महाभारत हे मिथक व इतिहास यांचे बेमालूम मिश्रण वाटते. वंचित व माणूसपणच नाकारल्या गेलेल्या सामाजिक वर्गाना महाभारत व त्याच्यातील पात्रांबद्दल वर्षानुवर्षे जिव्हाळा वाटत आला आहे. इ.स. पहिल्या शतकापासून अनेक पंथ, संप्रदाय व काही देवांचा वाढलेला प्रभाव त्यांना महाभारताचीच किमयामुळे हे झाले असे वाटते. महाभारत त्यांना अनन्यसाधारण सांस्कृतिक निर्मिती आहे की जी विभिन्न सामाजिक स्तरावरील भारतीयांना एकत्र आणते.गणेश देवी महाभारताची स्तुती करण्यात कोणतीही कमी ठेवत नाही त्यांच्या मते, हे महाकाव्य भारतीयांना राष्ट्र म्हणून एकत्र आणते.( देवी गणेश, २०२२, पृ. १०९-१५१)

जेथे एकाबाजूला इरावती कर्वे यांना महाभारत हा नियतीचा न चुकणारा क्रूर खेळ वाटतो तेथे गणेश देवी यांना महाभारत हे भव्य-दिव्य असे उत्कृष्ठ असे साहित्य वाटते. जे वर्णव्यवस्थेच्या विषमतेचा पुरस्कार करीत असूनही, गुलामगिरीवर आधारित समाजव्यवस्थेचे उदारीकरण करीत असूनही लोभस व भूतकाळाला जाणून घेण्याची रीत शिकविते असे वाटते. (देवी गणेश, २०२२, पृ. १६६-१६७)

डॉ. आ.ह.साळुंखे हे विद्वान वेगळ्या दृष्टिकोनातून महाभारतकालीन स्त्रियांच्याकडे बघतात. ज्याचा थोडक्यात या पार्श्वभूमीवर आढावा घेणे आणि तुलना करणे महत्त्वपूर्ण ठरते. डॉ.आ.ह.साळुंखे हे नल आणि दमयंती यांची कथा आपल्यापुढे ठेऊन तिची काल्पनिकता मान्य करतात मात्र या कथेतील नायक हा नल असला तरी दमयंतीच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा वाचकाच्या मनावर खोलवर पडत असल्याची नोंद ते करतात. कारण तो संपूर्ण कथेत त्यांना निष्क्रिय वाटतो तर दमयंती ही प्रयत्नवादी आणि सक्रीय असून जी परिस्थितीवर मात करताना दिसते. (साळुंखे आ.ह.,२०२०, पृ.२३) दमयंतीच्या स्वयंवर दुसऱ्या वेळी रचण्याचा प्रसंग, ज्यात भेटल्यावर नल याने राग व्यक्त करणे या गोष्टी डॉ. आ.ह. हे पुरुषप्रधान महाभारतकारांनी नल यास मुद्दाम खुजे बनविण्याचा प्रयत्न मानतात. यासाठी ते मनुस्मृतीच्या काळातील साहित्यातून वाढत जाणारी पुरुषप्रधानता जबाबदार मानतात. (साळुंखे आ.ह.,२०२०, पृ. ३४-३५)

रेणुका आणि जमदग्नी यांच्या कथेत रेणुकेचा शिरच्छेद कारण साळुंखे हे व्यभिचार मानत नाही तर बाण आणण्यास झालेला उशीर लक्षात घेतात. अर्थात महाभारतकार यांना ही घटना जमदग्नी ऋषी यांना कमीपणा आणणारी वाटली म्हणून या घटनेमागचे कारणच बदलले गेले असावे असे त्यांना वाटते. ही घटना देखील मनुस्मृतीच्या लेखनाच्या काळातील इ.स.पूर्व दुसऱ्या शतकातील असण्याची शक्यता डॉ. साळुंखे आ.ह. यांना वाटते. (साळुंखे आ.ह.,२०२०, पृ.३९-४३)

याबरोबर डॉ.आ.ह हे सत्यवती, अंबा, अंबालिका, गांधारी, लाक्षागृहात जळालेली निषाद (आदिवासी) स्त्री हिडींबा या स्त्री पात्रांच्या रूपाने प्रचलित मूळ कथेत घुसळण्यात आलेल्या दंतकथा उलगडून मूळ अर्थाला उलगडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांना आधुनिक काळातील स्त्रियांच्या वाटेला येणारी यातना आणि अगतिकता ही महाभारतकालीन जीवनाशी साधर्म्य साधणारी वाटते. (साळुंखे आ.ह.,२०२०, पृ.७९-१२७)

कौरवांना द्रोपदी ही केवळ श्रमदासी म्हणून नको होती तर भोगदासी म्हणून हवी होती. धर्मशास्त्रांच्या नियमांनी द्रोपदीची विटंबना करण्यासाठी कौरवांना मोकळीक दिली असे साळुंखे यांना वाटते. महाभारताच्या आदिपर्वात विवाहसंस्थेच्या स्थित्यंतराविषयी महत्त्वाच्या नोंदीनुसार आलेल्या कुंतीच्या नियोगाद्वारे पुत्रप्राप्तीच्या घटना, स्त्री-पुरुषांच्या लैंगिक स्वातंत्र्यावर बंधने नसणे ह्या घटना साळुंखे यांना मातृसत्ताक पद्धत जाऊन पितृसत्ताक पद्धत येण्याच्या एक ऐतिहासिक टप्पा वाटतो. स्त्रियांच्या स्वभावर महाभारताने विचार त्यांना स्वातंत्र्य उपभोगण्यास अपात्र ठरवितात. त्यांना कामदेवप्रिया ठरवून घराण्याचा नाश करणाऱ्या

असे चित्र रंगवले आहे. त्रैलोक्यात स्वातंत्र्यास पात्र एकही स्त्री नाही असे नोंदविले आहे. डॉ. साळुंखे यांना तर महाभारत व अन्य ग्रंथामधून स्त्रीनिंदेच्या घसरलेल्या भाषेतील वचनांना उदृत करणे देखील कठीण वाटते. महाभारतात एका पक्षीणीने सती जाऊन पतीसह स्वत:चा उद्धार करून घेतल्याची कथा मांडतात. साळुंखे यांना महाभारतातील सती जाण्याचे निर्देश कोड्यात टाकणारे वाटतात. या सती जाणाऱ्या घटना ऐतिहासिक आहेत की नाही यावर त्यांना शंका आहे. (साळुंखे आ.ह.,२०१७, पृ.४३-१७९)

उपिंदर सिंह यांच्या मते महाभारतात वर्णन केलेले स्त्रियांचे मजबूत चरित्र दाखवते की हाकाळ भारताच्या सामाजिक इतिहासाचा प्रारंभीचा काळ होता. ज्याकाळात स्त्रियांची स्थिती पुरुषांशी तुलना करता एवढी बंधनात नव्हती जेवढी नंतर झाली. याकाळातील नियोग प्रथा त्यांना सामाजिक विकासाची प्राचीन अवस्था दाखवते रामायनाशी तुलना करता महाभारत काळात जास्त नियंत्रण आले असावे असे त्यांना वाटते. (सिंह उपिंदर, २०२३, पृ.१८)

**निष्कर्ष :**

इरावती कर्वे यांनी लिहिलेले युगान्त हे मोठे प्रसिद्ध पुस्तक आहे. त्यांनी महाभारतातल्या स्त्री असो वा पुरुष पात्र यावर लिहिलेला एकन एक उतारा हा त्यांच्या तार्किक कौशल्याची पावती असला तरी त्यांनी महाभारत असो वा तुलनेच्या निमित्ताने मांडणीत आणलेले रामायण असो त्या पारंपरिक महाभारताच्या वा रामायणाच्या कक्षा भेदून पलीकडे जात नाही. त्यांना मातृसत्ताकपद्धती वा पुरुषसत्ताक पद्धती यातील हा सत्तासंघर्ष असल्याची थोडीही शंका येत नाही. वर्णव्यवस्था अबाधित ठेवण्याचा कौरव वा पांडवांचा प्रयत्न त्यासाठी स्त्रियांचे त्या अनुषंगाने देण्यात आलेले बलिदान जाणवत नाही. ना याकाळातील उत्पादन वा उत्पादन साधनांतील भौतिक बदल यांची त्या दखल घेतात. आधुनिक काळातील सामाजिक शास्त्रांच्या विकासातून आलेली आधुनिक दृष्टी मात्र त्या प्रत्येक पात्रांच्या वागण्यातून आणि चुकांवरून फिरवत राहतात. हेच काय ते त्यांचे यश आणि मर्यादा देखील म्हणता येतील.

**संदर्भ :**

१) कर्वे इरावती, युगान्त, देशमुख आणि कंपनी प्रा.लि., पुणे, २००६

२) साळुंखे आ.ह., महाभारतातील स्त्रिया भाग-२ , लोकायत प्रकाशन,सातारा, पुनर्मुद्रण २०२०

३) देवी गणेश, महाभारत महाकाव्य आणि राष्ट्र, पद्मगंधा प्रकाशन,मुंबई, २०२२

४) साळुंखे आ.ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई,२०१७

५) उपिंदर सिंह, प्राचीन एवं पूर्व मध्यकालीन भारत का इतिहास पाषाण काल से १२ वी शताब्दी तक, पियर्सन इंडिया एज्युकेशन सर्विसेज प्रा.लि. दिल्ली, २०२३